| MHRG120003032025 | खटला दाखल दिनांक | : | ११-०९-२०२५ |
|---|---|---|---|
| | खटला नोंदणी दिनांक | : | ११-०९-२०२५ |
| | निकाल दिनांक | : | १२-०३-२०२६ |
| | कालावधी **: ०० वर्ष, ०६ महिने, ०१ दिवस** | | |

**प्रथम वर्ग न्यायदंडाधीकारी मुरूड, जि. रायगड -अलिबाग,**
(पीठासीन अधिकारी - घनःशाम रा. तिवारी)

**नियमीत फौजदारी खटला क्र. ४१/२०२५** **निशाणी क्र.१४**

| प्रथम खबरी अहवालाचा तपशील<br>अपराध क्रमांक : ६२/२०२५, दिनांक ३१.०८.२०२५<br>पोलीस स्टेशन : मुरुड. | |
|---|---|
| तक्रारकर्ता | महाराष्ट्र शासन मार्फत पोलीस ठाणे अधिकारी, पोलीस ठाणे, मुरुड, जि. रायगड-अलिबाग |
| महाराष्ट्र शासन/फिर्यादी तर्फे | श्री सतिश नाईक सहाय्यक सरकारी अभियोक्ता. |
| आरोपी | **साईराज नथुराम माळी**<br>वय २३ वर्षे, धंदा - व्यवसाय<br>राहणार- मु.पो. शिघ्रे, ता. मुरूड, जि. रायगड. |
| आरोपीकरिता/ तर्फे सादरकर्ता | श्री डी.एन.पाटील, विधीज्ञ |
| गुन्हा घडल्याची तारीख | २६-०८-२०२५ |
| गुन्हा नोंदणी तारीख | ३१-०८-२०२५ |
| दोषारोप पत्र दाखल तारीख | ११-०९-२०२५ |
| दोषारोप निश्चित तारीख | १०-११-२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १२-०२-२०२६ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याची तारीख | -- |
| न्यायनिर्णय घोषीत केल्याची तारीख | १२-०३-२०२६ |
| शिक्षा दिल्याची तारीख जर असेल तर | निरंक |

| आरोपी चा अ.क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनवर सोडल्याची तारीख | गुन्हा ठेवल्याचा तपशील | निर्दोषमुक्त केले किंवा शिक्षा केली | किती शिक्षा दिली | खटला सुरु असतांना आरोपी कारागृहात असल्या बाबतचा तपशील |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | साईराज नथुराम माळी, | -- | ११-०९-२०२५ | भा.न्या.संहिता कलम ७९, ३५१(२), ३५२ | निर्दोष मुक्त | लागू नाही | निरंक |

सरकार तर्फे नोंदवलेल्या साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | नाव | साक्षीचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र. १. | मानवी मुकेश नाक्ती | फिर्यादी |

बचावपक्षातर्फे नोंदवलेल्या साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | नाव | साक्षीचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

बचावपक्षाने मान्य केलेल्या कागदपत्रांची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | १३ | घटनास्थळ पंचनामा |

## न्या य नि र्ण य

(दिनांक. १२-०३-२०२६ रोजी अधिघोषीत)

आरोपीविरुद्ध प्रस्तुत खटला भारतीय न्याय संहिता (थोडक्यात भा.न्या.स.) कलम ७९, ३५१(२), ३५२ अन्वये शिक्षेस पात्र अपराधासाठी चालविण्यात आला.

**०२.** अभियोगपक्षाच्या कथनानूसार, एप्रिल २०२५ मध्ये तक्रारदार पिडीता हिला तिचे एअरटेल मोबाईलवर आरोपीने फोन करून 'तू माझी झाली नाही तर मी तुला कोणाचीच होवू देणार नाही, तूला मी सोडून दुसर कोणासोबत बघु शकत नाही' असे म्हणाला. दिनांक २६-०८-२०२५ रोजी तक्रारदारच्या भावाने घरी येवून सांगीतले की, आरोपीने तक्रारदारचा फोटो त्याच्या व्हॉटसॲपला डी.पी. ठेवल्याचे त्याने त्याचे आतेभावाचे मोबाईलवर पाहिले. आरोपीशी काहीही संबंध नसतांना त्याने तक्रारदारचा फोटा मोबाईलवर डी.पी. ठेवल्याने तक्रारदारला मनात लज्जा उत्पन्न झाली अशा आशयाची तिने आरोपीविरुद्ध मुरूड पोलीस ठाणे येथे तक्रार दिली.

**०३.** सदर तक्रारीवरुन आरोपींविरुद्ध मुरुड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवही क्र.-६२/२०२५ प्रमाणे भारतीय न्याय संहिता कलम ७९, ३५१(२), ३५२ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा नोंदविण्यात आला. पोलीस हवालदार भाऊसाहेब सुभाष गव्हाणे यांनी घटनेचा तपास केला. त्यांनी घटनास्थळ पंचनामा केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले. तपासाअंती आरोपीविरूध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

**०४.** आरोपी न्यायालयात हजर झाल्यावर आरोपींविरुध्द (निशाणी क्र. ०७ प्रमाणे ) भारतीय न्याय संहिता कलम ७९, ३५१(२), ३५२ नुसार शिक्षेस पात्र गुन्हयाचा आरोप निश्चित करुन दोषारोपणातील मजकूर आरोपींना वाचून समजावून सांगीतला. आरोपीने (नि.क्र.०८) प्रमाणे आरोप कबुल नसल्याचे सांगून संपरिक्षेची मागणी केली.

**०५.** अभियोगपक्षातर्फे प्रस्तुत प्रकरणात तक्रारदार हा एकच साक्षीदारला तपासण्यात आले आहे.

**०६.** आरोपीविरुध्द गुन्हयात गोवणारा पुरावा नसल्याने त्याचा भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ३५१(१) (ब) नूसार जबाब नोंदविण्यात आला नाही.

**०७.** अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील व आरोपीचे वकील यांचा युक्तीवाद ऐकला. खटल्यातील पुरावा व उभय पक्षाचा युक्तिवाद या सर्व बाबींचे अवलोकन करता न्यायीक निकालासाठी उपस्थीत झालेले मुद्दे, त्यावरील माझे निष्कर्ष व निष्कर्षामागील कारणे खालील प्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दिनांक एप्रिल २०२५ मध्ये मौजे शिघ्रे ता.मुरुड येथे पिडीतेच्या मोबाईलवर फोन करून आरोपी तिला 'तू माझी झाली नाही तर मी तुला कोणाचीच होवू देणार नाही, तूला मी सोडून दुसर कोणासोबत बघु शकत नाही' असे म्हणाला व दिनांक २६.०८.२०२५ रोजी पिडीतेशी काही संबंध नसतांना तिचा फोटा व्हॉटसॲपवर डी.पी. म्हणून ठेवून तिच्या मनाला लज्जा उत्पन्न केली हे अभियोगपक्षाने सिध्द केले काय ? | नाही |
| २. | वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने पिडीतेला फौजदारी धाकटपशा केला हे अभियोगपक्षाने सिध्द केले काय ? | नाही |
| ३. | वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने पिडीतेला अश्लील शिवीगाळ करून अपमानीत केले आणि सार्वजनिक शांतता भंग करण्यास अगर अपराध करण्यास प्रवृत्त केले, हे अभियोगपक्षाने सिध्द केले काय ? | नाही |
| ४. | अंतिम आदेश काय? | आरोपी दोषमुक्त |

## निष्कर्षामागील कारणमिमांसा

**मुद्दे क्र.१ ते ४ बाबतः**

**०८.** तक्रारदार/पिडीता (सा.क्र.१) हिच्या पुराव्यात असे आले आहे की, तिच्याकडे रिअलमी कंपनीचा मोबाईल असून एप्रिल २०२५ मध्ये तिला फोन आला होता. फोन करणा-याचे नाव तिला आठवत नाही, फोनवरील समोरील व्यक्ती काय म्हणाला ते तिला आठवत नाही. दिनांक २६.०८.२०२५ रोजी तिच्या भावाने त्याच्या फोनवर एक डी.पी. दाखवला होता. तिला असा संशय होता की, तो फोटो तिचा आहे. म्हणून तिने पोलीसांत तक्रार दिली होती. तक्रारदारने तक्रारवरील तिची फक्त सही ओळखली व त्यातील मजकूर माहित नसल्याचे सांगीतले. तक्रारदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी न्यायालयाच्या परवानगीने तिला उलट तपासामध्ये विचारण्याजोगे प्रश्न विचारुन आवश्यक पुरावा आणण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यातून अभियोग पक्षास मदतीची ठरेल अशी काहीएक बाब अभिलेखावर आली नाही.

**०९.** उलटतपासात तक्रारदारने कथन केले की, तिने गैरसमजुतीतून तक्रार दिली होती, आरोपीविरूध्द तिला आता काहीएक तक्रार राहिलेली नाही, तिला आणखी साक्षीदार तपासायचे नाही. तक्रारदारने सरतपासात तिची आरोपीसोबत न्यायालयाबाहेर तडजोड झाली आहे असे मान्य केले आहे. अशा परिस्थीतीत आणखी साक्षीदार तपासून उपयोग होणार नसल्याने अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

**१०.** अभियोग पक्षाच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अभियोग पक्षाची महत्वाची साक्षीदार तक्रारदार हिने आरोपीविरूध्द काहीएक साक्ष दिलेली नाही. तक्रारदारने निशाणी १० वर सादर केलेल्या पुरसिसनूसार उभयपक्षांमध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे दिसून आले. अशा परिस्थीतीत आणखी पुरावा नोंदवून उपयोग होणार नसल्याने इतर साक्षीदार तपासण्यात आले नाही.

**११.** आरोपीविरुध्दचा दोषारोप निःसंशयपणे सिध्द होईपर्यंत आरोपी निर्दोष आहे हे फौजदारी कायदयाचे मुळ गृहीतक आहे. प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षाच्या पुराव्यात आरोपीने प्रस्तुत गुन्हा केल्याबाबत काहीएक ठोस व सबळ पुरावा अभिलेखावर आलेला नसल्याने मी मुद्दे क्र.१ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविले आहे.

**मुददा क्र. ४ बाबत -**

**१२.** मुद्दा क्र. १ ते ३ च्या निष्कर्षान्वये आरोपीविरुद्धचा अपराध सिध्द झालेला नसल्याने तो निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतो. आरोपीच्यावतीने त्याने पूर्वी दिलेला जामीन भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४८१ ची पूर्तता म्हणून पुढील सहा महिन्यांसाठी कायम ठेवण्यात यावा असा विनंतीअर्ज करण्यात आला असून तो मंजूर करण्यात आला आहे. सबब मुद्दा क्र. ४ च्या उत्तरार्थ मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

| | |
|---|---|
| ०१. | आरोपी **साईराज नथुराम माळी** याला भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २७१(१) अन्वये त्याच्यावर लावण्यात आलेल्या भारतीय न्याय संहिता कलम ७९, ३५१(२), ३५२ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| ०२. | आरोपीच्या वतीने त्याने पूर्वी दिलेला जामीन भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४८१ ची पूर्तता म्हणून पुढील सहा महिन्यांसाठी कायम ठेवण्यात येत आहे. |
| | न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला. |

GHANSHAM RAMLAL TIWARI
Digitally signed by GHANSHAM RAMLAL TIWARI
Date: 2026.03.16 14:49:21 +0530

दिनांक : १२-०३-२०२६

(घनःशाम रा. तिवारी)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
मुरूड, जि. रायगड-अलिबाग